सहायक निबंधक, सहकारी संस्था, गट-ब या पदासाठी शिफारस केलेल्या उमेदवारांना परिविक्षाधीन कालावधीत प्रशिक्षणासाठी नियुक्ती देण्यास्तव अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः राजस-१२१४/प्र.क्र.५५/१२-स
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: १९ जानेवारी, २०१६

वाचा :

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांकः पदनि २०१२/प्र.क्र. ६६/१२/वित्तीय सुधारणा-१ दि. ११ जुलै, २०१२.
२) शासन निर्णय क्र.टिआरएन-२०१३/प्र.क्र.८४/१३/१२-अ, दि.२०.०१.२०१४
३) सामान्य प्रशासन विभाग, पत्र क्र.टिआरएन ०३१५/प्र.क्र.३५/१५/१८-ब , दि.११.४.२०१४

प्रस्तावना :

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्य सेवा परीक्षेद्वारे सरळसेवेने नियुक्त होणाऱ्या गट-अ व गट-ब मधील अधिकाऱ्यांचा एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम अनुक्रमे यशदा, पुणे आणि वनामती, नागपूर या संस्थांमार्फत सुरु करण्यास सामान्य प्रशासन विभागाच्या उपरोक्त दि.२०.०१.२०१४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सन २०१४ च्या राज्यसेवा परीक्षेद्वारे सहायक निबंधक, सहकारी संस्था, गट-ब या पदासाठी शिफारस करण्यात आलेल्या नवनियुक्त ४ परिविक्षाधीन उमेदवारांसाठी २ वर्षे प्रशिक्षण कालावधीकरिता अधिसंख्य पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सन २०१४ च्या राज्य सेवा परीक्षेद्वारे सहायक निबंधक, सहकारी संस्था, गट-ब या पदासाठी शिफारस केलेल्या खालील ४ उमेदवारांना परिविक्षाधीन कालावधीमध्ये वनामती, नागपूर या संस्थेमार्फत प्रशिक्षणासाठी नियुक्ती देण्यास्तव, उमेदवार रुजू होण्याच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक ०२.०५.२०१५ पासून २ वर्षांचा प्रशिक्षण कालावधी संपुष्टात येईपर्यंत सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आस्थापनेवर सहायक निबंधक, सहकारी संस्था, गट-ब या संवर्गात ०४ अधिसंख्य पदे निर्माण करण्यास याव्दारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	नांव	प्रवर्ग
१	श्री. रणजित महादेव पाटील	खुला
२	श्री.प्रशांत शिवाजीराव पाटील	खुला
३	डॉ. ज्योती शिवाजी जाधव	खुला (महिला)
४	श्रीमती प्रेरणा रमेश शिवदास	अ.जा. (महिला)

२. सदर अधिसंख्य पदांच्या वेतन व भत्यांवर होणारा मासिक / वार्षिक खर्च, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयाच्या Cooperation, Marketing & Textile Department, Demand No.01 (c) Economic Services (a) General Economic Services, 2425-Cooperation, 001-Direction & Administration,001-(1)(a) Commissioner for Cooperation & Registrar of Cooperative Societies-(24250011) या लेखाशिर्षाखाली वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ३३८/विसु-१, दि. २/१२/२०१५ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०११६१६२७०९३४०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Motiram K Bhoye

Digitally signed by Motiram K Bhoye
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Motiram K Bhoye
Date: 2016.01.19 15:00:49 +05'30'

(मो.का. भोये)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे.
२. संचालक, वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. संचालक, पणन, महाराष्ट्र राज्य,पुणे.
४. सर्व विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था (प्रशासन /लेखापरीक्षण)
५. सर्व जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था
६. महालेखापाल,महाराष्ट्र १/२,मुंबई/नागपूर (लेखापरीक्षा व लेखा अनुज्ञेयता)
७. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
८. वित्त विभाग (विसु-१), मंत्रालय, मुंबई-३२.
९. खाजगी सचिव, मा. मंत्री (सहकार) / मा.मंत्री (पणन) /मा.मंत्री (वस्त्रोद्योग)/ मा. राज्यमंत्री (सहकार, पणन व वस्त्रोद्योग), मंत्रालय, मुंबई-३२.
१०. अ.मु.स. (पणन)/प्रधान सचिव (वस्त्रोद्योग)/सचिव (सहकार) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
११. सर्व उपसचिव/अवर सचिव/सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन/१२-अ, मंत्रालय, मुंबई-३२.
१३. निवड नस्ती.